**मे. मॉइल लिमिटेड या कंपनीव्दारे मौजा-चिखला,येदुर्बुची आणि सीतासावंगी तह. तुमसर जि. भंडारा येथे १,८०,००० टीपीए वरुन विस्तारानंतर ४,००,००० टीपीए टन प्रतिवर्ष मॅगनिज उत्पादन विस्तारित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त दि. २९/०६/२०२२.**

मे. मॉयल लिमिटेड या कंपनीव्दारे मौजा- चिखला, यदुर्बुची आणि सीतासावंगी ता. तुमसर जि. भंडारा येथे १,१८,००० टीपीए टन प्रतिवर्ष वरून विस्तारित ४,००,००० टीपीए टन प्रतिवर्ष विस्तारित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक २९.०६.२०२२ रोजी दुपारी २.०० वा. चिखला तह. तुमसर जि. भंडारा येथे आयोजित करण्यात आली होती. श्री. महेश पाटील अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी तथा निवासी उप-जिल्हाधिकारी भंडारा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री. अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नागपूर पर्यावरण विषयक लोकसुनावणीचे सदस्य दूरदृश्यप्रणालीव्दारे, तसेच उप-जिल्हा दंडाधिकारी तुमसर तथा सहाय्यक जिल्हाधिकारी श्रीमती. बी. वैष्णवी जनसुनावणीस उपस्थित होत्या. श्रीमती हेमा देशपांडे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, भंडारा या लोकसुनावणीच्या समन्वयक होत्या. लोकसुनावणीत सुमारे १०० जण सहभागी झाले होते. (उपस्थितांची यादी सोबत जोडत आहे)

सहमहा व्यवस्थापक(सुरक्षा व पर्यावरण) मे. मॉइल लिमिटेड नागपूर यांनी दिनांक १९/०५/२०२२ च्या पत्राद्वारे चिखला मॅगनीज खाण तह. तुमसर जि. भंडारा येथे प्रस्तावित १,८०,००० टीपीए टन प्रतिवर्ष वरुन विस्तारानंतर ४,००,००० टीपीए टन प्रतिवर्ष मॅगनीज उत्पादन विषयक जनसुनावणी घेण्याचा प्रस्ताव म.प्र.नि. मंडळाकडे सादर केला. सदर प्रकल्पास केंद्र शासनाच्या पर्यावरण वने व वातावरणीय बद्दल मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून पर्यावरण विषयक मंजुरी आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयाने दि. २६ मे २०२२ रोजी ई-मेलद्वारे पर्यावरण विषयक लोकसुनावणी प्रक्रिया प्रारंभ करण्यास मान्यता दिली.

१४ सप्टें २००६ च्या EIA अधिसूचनेनुसार, १/१२/२००९ मध्ये सुधारित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, स्थळ, तारीख आणि वेळ जिल्हा दंडाधिकारी, भंडारा यांच्या मंजुरीने अंतिम करण्यात आली. म.प्र.नि.मंडळच्या क्र. MPCB/BO/JD (WPC)/PH/B- २२०६१७ एफटीएस ००८२ दि. १७/०६/२०२२ नुसार २९ जून २०२२ रोजी दुपारी २.०० वाजता मे. चिखला मॅगनीज खाण, यांच्या प्रकल्पस्थळी घेण्यात आली. (प्रत संलग्न).

सदर पर्यावरणा विषयक लोकसुनावणीची जाहिरात इंग्रजी दैनिक "द हितवाद" आणि मराठी दैनिक "महाराष्ट टाईम्स" मध्ये दिनांक २८/०५/ २०२२ तसेच म.प्र.नि. मंडळाच्या संकेत स्थळावर संबंधितांना अभ्यासण्यासाठी हरकती, सूचना इत्यादी प्राप्त करण्यासाठी प्रकाशित करण्यात आली होती. (प्रत संलग्न).

सदर प्रकल्पाबाबत प्रश्न, शंका, सूचना, आक्षेप, निवेदन असल्यास लेखी स्वरुपात पाठविण्याचे जाहिरातीत नमूद केले होते. कार्यकारी सारांश इंग्रजी आणि मराठीत सॉफ्ट कॉपीसह खालील कार्यालयात लोकांच्या माहितीसाठी आणि अभ्यासासाठी ठेवण्यात आला होता.

१. जिल्हाधिकारी, भंडारा.
२. जिल्हा उद्योग केंद्र भंडारा.
३. जिल्हा परिषद, भंडारा.
४. उप-विभागीय अधिकारी, तुमसर तह. तुमसर जि. भंडारा.
५. पंचायत समिती, तुमसर तह. तुमसर जि. भंडारा.
६. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, ५ वा मजला, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर
७. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
८. म.प्र.नि. मंडळ (मुख्यालय) सायन सर्कल, सायन (पूर्व), मुंबई-२२.
९. मुख्याधिकारी नगरपरिषद, तुमसर तह. तुमसर जि. भंडारा
१०. ग्रामपंचायत कार्यालय, चिखला तह. तुमसर जि. भंडारा
११. ग्रामपंचायत कार्यालय सीतासावंगी तह. तुमसर जि. भंडारा
१२. ग्रामपंचायत कार्यालय यदुरबुची तह. तुमसर जि. भंडारा

**म.प्र.नि. मंडळाकडे लोकसुनावणीपूर्वी कोणतेही लेखी आक्षेप, निवेदन, सूचना प्राप्त झाल्या नाहीत,**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने दुपारी २.०० वाजता लोकसुनावणीचे कामकाज सुरू झाले. समन्वयक श्रीमती हेमा देशपांडे, उप प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी प्रास्ताविकात लोकसुनावणीची कार्यपद्धती विषयी माहिती दिली आणि स्पष्ट केले की, जनसुनावणी समितीला शिफारस करण्याचा किंवा प्रकल्प मंजूर करण्याचा अधिकार नाही. प्राप्त लेखी आक्षेप, निवदने, सुचना, झालेले कामकाजाचे इतिवृत्त, व्हिडिओ रेकॉर्डिंगसह कार्यवाही पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मंत्रालयाकडे सादर केली जाईल. त्यानंतर उप प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी प्रकल्प प्रवर्तक मे. मॉइल लिमिटेड नागपूर यांना प्रस्तावित प्रकल्पांचे विस्तृत प्रस्तुतीकरण देण्यासाठी आमंत्रित केले.

मे. माइल लि. चे प्रतिनिधी यांनी प्रस्तावित खाण प्रस्तावाची पार्श्वभूमी दिली. प्रस्तावित प्रकल्पाची सविस्तर माहिती समजावून सांगितले व तांत्रिक सल्लगारास मराठीत विस्तृत पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन देण्यास सांगितले. प्रस्तावित प्रकल्पाचा तपशील, सध्याची पर्यावरण स्थिती, प्रस्तावित प्रकल्पाचा परिणाम त्यांनी पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनमध्ये मांडले. सुनावणीच्या समन्वयक श्रीमती हेमा देशपांडे यांनी मा. अध्यक्षांच्या परवानगीने उपस्थितांना प्रकल्पाबाबत त्यांचे मत, सूचना, विचार टीका-टीप्पणी आक्षेप व हरकती इत्यादी मांडण्यास आमंत्रित केले. मा. अध्यक्ष श्री. महेश पाटील, यांनी लोकांना विचारण्याबाबत आवाहन केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टीप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे आहेत.**

**१) श्री. रोहिदास गायकवाड, उप-सरपंच, चिखला**

| | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | • विस्तारित प्रकल्पामध्ये चिखला गावातील किती लोकांना रोजगार मिळणार आहे? नोकरी किती लोकांना मिळणार आहे? नोकरी तात्पुरत्या स्वरुपाची असेल की कायमस्वरुपाची असेल ? कायमस्वरुपाची असेल तर किती लोकांना कायमस्वरुपी करणार आहात ? नोकरी देताना गावातील लोकांना किती देणार ? खाणकाम कसे होणार ?<br>• सीएसआयआर फंड हा दुसरीकडे वर्ग करण्यात येत असल्यामुळे चिखला गावातील लोकांना त्याचा या फंडाचा फायदा होत नाही. हा फंड आमच्या गावाला देण्यात यावा. तसेच कौशल्य विकास योजना आणि उपजीविका याबद्दल आपण काय नियोजन केलेले आहे?<br>• आमच्या आजूबाजूच्या परिसरातील खाणीच्या ट्रकच्या वाहतुकीमुळे रस्ते खराब झाले आहेत. रस्त्यांची दुरूस्ती व रस्ते रुंदीकरण व्हावे जेणे करुन रस्त्यावच्या दुर्घटना कमी होतील. रस्त्याच्या दोन्ही कडेला झाडांची लागवड करावी जेणेकरुन आपल्या क्षेत्राच्या सौंदर्यामध्ये भर पडेल. | • मॉइल हा विस्तारित प्रकल्प सुरू होईल तेव्हा या प्रकल्पामध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य राहील. सध्या या कंपनीमध्ये ६५० कामगार आहेत. या प्रकल्पामधून ४ लाख टन प्रतिवर्ष खनिज उत्पादन होईल तेव्हा अतिरिक्त २९० लोकांना सामावून घेणार. यामध्ये काही तांत्रिक व अतांत्रिक पदे आहेत. युवकाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार त्यांना रोजगार देण्यात येईल. या प्रस्तावित खाणकाम प्रकल्पामध्ये मुख्यत भूमीगत खाणकाम होणार असून काही प्रमाणात खाणकाम हे खुल्या पध्दतीने होईल काही काम हे अधिभरणातून खनीज काढण्यात येईल.<br>• मॉयल यांनी सीएसआयआर फंडातून मागील पाच वर्षात ७.१३ करोड रुपये खर्च केला आहे. तसेच सीएसआयआर फंड हा मुख्यालयाच्या दिशानिर्देनुसार देण्यात येतो. ज्यामध्ये शैक्षणिक सुख-सुविधा, आरोग्याच्या सुख-सुविधा. हवा प्रदूषण नियंत्रणाकरिता प्रस्तावित जागेत (CAQMS) या अत्याधुनिक प्रदूषण सयंत्रणा लावण्यात येणार आहे. तसेच, ध्वनी प्रदूषण, हवा प्रदूषण आणि जल प्रदूषण यावर योग्य उपयायोजनांसाठी पैसा खर्च करण्यात येईल. तसेच कौशल्य विकास योजनेअंतर्गत गावातील होतकरू लोकांना योग्य प्रशिक्षण देण्यात येईल जसे की, शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी, जनावरांच्य पालन-पोषणासाठी प्रशिक्षण देण्यात येईल.<br>• तुम्ही दिलेल्या सूचनांचे नोंद घेण्यात येईल. खाणीच्या हद्दीतील ट्रक वाहतुकीमुळे जे रस्ते खराब झाले आहेत ते दुरूस्त करण्यात येईल. परंतु जे रस्ते राज्य शासनाच्या हद्दीतील आहेत त्यांच्या दुरूस्तीची जबाबदारी राज्य शासनावर आहे. खाणीच्या हद्दीतील आजूबाजूच्या परिसरामध्ये झाडांची लागवड केली जाईल. |

२) श्री. आझाद कुरेशी, गोबरवाही

| | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | या प्रस्तावित प्रकल्पाचे मी स्वागत करतो कारण या प्रस्तावित प्रकल्पामुळे आमच्य गावातील लोकांना रोजगार मिळणार आहे. इतर गावातील लोक रोजगासाठी शहरांकडे स्थलांतरित होत आहे परंतू ही कंपनी आल्यापासून आमच्या परिसरातील लोकांना कधी स्थलांतर करावे लागले नाही. आमच्य परिसरातील युवकांना रोजगार प्राप्त होणार आहे. तसेच काम बंद बसल्यामुळे रोजगार पण मिळत नाही. या प्रस्तावित प्रकल्पाला लवकर पर्यावरण अनुमती मिळावी ही विनंती. | धन्यवाद |

३) श्री. शाहबाज खान, चिखला

| | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | या प्रस्तावित प्रकल्पाचे मी स्वागत करतो कारण सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे आजूबाजूच्या गावातील लोकांना रोजगार व आरोग्याची सुख-सुविधा आजूबाजूच्य गावातील लोकांचा विकास होईल, युवकांना रोजगार मिळेल. | धन्यवाद |

४) श्रीमती. नितू मडावी, चिखला

| | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | या प्रस्तावित प्रकल्पाचे स्वागत करतो. चिखला या गावामध्ये नवीन वसाहत व्हावी तसेच सामूदायिक भवन व्हावे, सौर ऊर्जेवर चालणारे पथदिवे आणि कामाकरिता आदिवासी मुलांना प्राधान्य देण्यात यावे व पिण्याच्य पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच चिखला खाणीच्या परिसरामध्ये काही पर्यावरणविषयक काही समस्या नाही. चिखलामधील ज्या स्थानिक महिला आहे त्यांना रोजगार मिळाला पाहिजे. कारण ज्या अशिक्षित महिला आहे त्यांना दुसरे कोणतेही काम येत नाही चिखलामध्ये जर मॉयल वसाहत आली तर त्यांना छोटे-मोठे व्यवसाय करता येईल. | चिखला या गावामध्ये नवीन वसाहतीकरिता मुख्यालस चर्चा करून व निर्देशानुसार आणि प्रशासकीय मान्यतेनुसार ठिकाण ठरवून आदेशानुसार कामे केली जाईल. आम्ही आश्वासन देतो की वसाहतीकरिता प्राधान्य चिखला ला असेल. तसेच, सामूदायिक भवन व्हावे, सौर ऊर्जेवर चालणारे पथदिवे याकरिता मूल्यांकरून काम करण्यात येईल. |

..५..

५) श्री. सी. बी. वर्गीस, सीतासावंगी

| | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | प्रस्तावित विस्तारिकणाची क्षमता १४०००० टन प्रतिवर्ष वरुन ४०००००० टन प्रतिवर्ष खनीज उत्पादन क्षमतेमध्ये वाढ होणार असल्याने सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे अतिरिक्त सीएसआयआर फंड मिळेल ज्यामुळे रोजगार वाढेल, आजूबाजूच्या गावाची प्रगती होईल व सर्व लोकांना योग्य त्या सुख-सुविधा उपलब्ध होईल. तसेच मॉइल यांनी चिखला या गावामध्ये हॉल बांधून दिले आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाला पर्यावरणविषयक अनुमती मिळावी ही विनंती. | धन्यवाद |

६) रवी निखारे, चिखला

| | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | या प्रस्तावित प्रकल्पामुळे खोदकाम करण्यासाठी जी स्फोटके वापरणार आहात त्यामुळे आमच्या गावातील घरांना तडे जातील काय व त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई बदल काय नियोजन आहे ? | आम्ही ब्लास्टिंग करतेवेळी नियंत्रित ब्लास्टिंग पध्दतीचा वापर करणार आहोत, ज्यामध्ये ब्लास्टिंग करतेवेळी आम्ही अत्याधुनिक पध्दतीचा वापर करणार आहोत व सदर जागेवरुन लोकवसाहत ही ३ ते ४ चार किलोमीटर अंतरवावर असल्या कारणाने कोणत्याही लोकवस्तीला यापासून धोका नाही. |

७) श्री. अजित ठाकरे डोंगरी.

| | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | • सदर खाणीच्या आजूबाजू तीन ते चार खाणी आहेत आणि ब्लास्टिंमुळे काम करणाऱ्या लोकांना सिकलसेल हा आजार होत असल्याचे आढळून आहे हे खरे आहे का ? किंवा सिकलसेल आमच्या क्षेत्रात जास्त आहे का ?<br>• तरी रुग्णवाहिकेची सुविधा आमच्या गावाला देण्यात यावी तसेच सिकलसेल या आजारावरुन काय उपाययोजना केल्या याबद्दल माहिती देण्यात यावी. | • मॅगनीजच्या खाणीमुळे मॅगनीज पॉयझनिंग हा आजार होतो पण सिकलसेल या आजाराशी मॅगनीज खाणचे काहीही संबंध नाही.<br>• सीएसआर फंडामधून एक रुग्णवाहिका देण्यात आलेली आहे आणि सिकलसेल या आजारावर गैर-सरकारी संस्थेव्दारे काम करुन घेऊ तसेच आरोग्य विभागामार्फत हा आजार कशामुळे होतो व या आजारावर काय उपाययोजना करता येईल याबद्दल चर्चा-विमर्श केले जाईल. |

अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी भंडारा व अध्यक्ष लोकसुनावणी समिती यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली व सदर प्रस्तावित मॅगनीज खाणीबाबत उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व योग्य ते मुद्दे उपस्थित केले व त्यांची नोंद घेण्यात आली आहे, असे कळविले. जन सुनावणी समितीचे अध्यक्ष श्री. महेश पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. समन्वयक श्रीमती हेमा देशपांडे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनिधी यांनी सर्वांचे आभार मानले, माननीय अध्यक्ष यांचे परवानगीने जाहिर लोकसुनावणी संपली, असे जाहीर करण्यात आले.

**(महेश पाटील)**
**अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी,**
**भंडारा व अध्यक्ष, लोक सुनावणी समिती**

**(अशोक करे)**
**प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व सदस्य, लोक सुनावणी समिती**

**(हेमा देशपांडे)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, भंडारा व समन्वयक, लोक सुनावणी समिती**